# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.01.2026** **वार- गुरुवार**

---

**मतदान**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली. काही मतदान केंद्रांवरच्या किरकोळ तक्रारी वगळता मतदान शांततेत झालं. आज दुपारी साडेतीन वाजेपर्यंत एकंदर 37 टक्के मतदान झालं. सकाळपासूनच विविध मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिकांसह अन्य मतदारांनी मतदानासाठी रांगा लावल्या होत्या. मतदान झाल्यानंतर निवडणूक आयोगाने तयार केलेल्या सेल्फी पॉईंटवर मतदान केल्याचा फोटो काढण्यासाठीही मतदारांमध्ये उत्साह दिसून आला.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी कोथरूड इथल्या पी जोग शाळेत कुटुंबीयांसह मतदानाचा हक्क बजावला. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कोथरूड इथल्या एकलव्य महाविद्यालयात मतदान केलं. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी बिबेवाडी इथल्या सिताराम बिबवे शाळेत मतदानाचा हक्क बजावला. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी न्यू इंग्लिश स्कूल इथं मतदान केलं. दुपारच्या सत्रात मतदान केंद्रांवर फारशी गर्दी नव्हती दुपारी चार नंतर मतदान केंद्रांवर पुन्हा रांगा लागल्याचं चित्र पाहायला मिळालं. मतदान केंद्रांवर मतदारांचे भ्रमणध्वनी सांभाळण्यासाठी स्काऊट गाईडची व्यवस्था काही ठिकाणी करण्यात आली होती.

काही ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बंद पडल्याने मतदान प्रक्रियेला तात्पुरता विलंब झाला. मात्र निवडणूक प्रशासनाने तातडीने पर्यायी मशिन उपलब्ध करून देत मतदान प्रक्रिया सुरळीत केली. मतदान केल्याची नोंद करण्यासाठी मार्करचा वापर केला जात असून ही शाई पुसली जात असल्याच्या तक्रारी अनेक ठिकाणाहून येत आहे.

पुण्यातही नऱ्हे, वडगाव बुद्रुक, धायरीमधील काही मतदान केंद्रावर बोटावरील शाई पुसण्याचे प्रकार झाले अशी तक्रार झाली होती.

मात्र या सर्व प्रकरणावर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिलं आहे. बोटावर लावलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणं हे गैरकृत्य आहे. त्याचबरोबर बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचं आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असं राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज स्पष्ट केलं.

बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. 2011पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करण्याचं गैरकृत्य करू नये, असं आवाहन आयोगाने केलं आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूकीसाठी मतदारयादीमधील आपलं नाव आणि मतदान केंद्र शोधण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्याचा लाभ जवळ जवळ चाळीस हजार मतदारांनी घेतला.

त्याचबरोबर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निसर्गसंवर्धन, स्वच्छता, आरोग्य आणि शाश्वत विकासाचा संदेश देणारी नाविन्यपूर्ण मतदान केंद्र उभारली होती. या मतदान केंद्रात संबंधित विषयानुसार सजावट, माहितीपर फलक आणि जनजागृती करणारे संदेश देण्यात आले.

**पिफ**

२४वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव म्हणजेच पिफ आजपासून सुरू होत आहे. पुणे फिल्म फाउंडेशन, राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांनी संयुक्तपणे या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. महोत्सवाचा उद्घाटन सोहळा सध्या सुरू आहे. उद्घाटन सोहळ्यात सुरुवातीला दिवंगत माजी मंत्री सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर निकिता मोघे दिग्दर्शित हिंदी गाण्याच्या नृत्याचा कार्यक्रम सादर झाला. भारतीय चित्रपट सृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरीदा जलाल आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना यंदाच्या 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड'नं सन्मानित केलं जाणार आहे. तसंच ज्येष्ठ व्हायोलिन वादक आणि संगीतकार अमर हळदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. येत्या २२ जानेवारीपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार आहे. त्या अंतर्गत पुण्यातील विविध चित्रपट गृहांमध्ये जगभरातील दर्जेदार चित्रपट, रसिकांना पाहता येतील. उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर इटलीचा ‘ला ग्राझिया’ हा पावलो सोरेंटीनो दिग्दर्शीत चित्रपट दाखवण्यात येणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा जोर आता कमी झाला आहे. मात्र सकाळच्या वेळी हवेत गारवा जाणवत आहे. उद्या किमान तापमान 14 तर कमाल तापमान 28 अंशांच्या आसपास राहण्याचा पुणे

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**